माझ्या मुलापेक्षाही मला जनता प्रिय, पंकजा मुंडे यांची जनतेला भावनिक साद

>> पान 2

महावितरणचा भोंगळ कारभार नागरिकांच्या जीवावर

>> पान 3

अवैधरित्या रेती वाहतूक करणाऱ्या दोन टिप्पर वर कारवाई


>> पान 4

**सुविचार**

निश्चयी भिकारी हा अनिश्चयी सम्राटापेक्षा कितीतरी श्रेष्ठ असतो.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

पुन्हा पुढे ढकलली राम चरणच्या गेम चेंजरची रिलीज डेट, करावी लागणार इतकी प्रतीक्षा

आतील पान


■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 68 ■ सोमवार, दि. 14 ऑक्टोबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


# लाडका मुख्यमंत्री म्हणून एकनाथ गोरगरिबांच्या हृदयात

## कॉमन मॅन एकनाथ शिंदेंचे फलक झळकले




दैनिक आपला विदर्भ

**मेहकर** : आपल्या कामाच्या बळावर अवघ्या दोन ते अडीच वर्षाच्या अल्पशा काळात संपूर्ण महाराष्ट्रात विकासाची जंत्री पोहोचवणारे मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांचे नाव अग्रक्रमावर आहे. प्रत्येक कामावर तात्काळ निर्णय आणि स्पष्ट बोलणारे निस्वार्थी व्यक्तिमत्व असलेले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अवघ्या दोन ते अडीच वर्षाच्या कार्यकाळात लाडका मुख्यमंत्री म्हणून गोरगरिबांच्या हृदयात स्थान मिळवलेले आहे. लाडकी बहीण... लाडका भाऊ... आणि आपल्या सरकारमधील लाडका मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जात असून निवडणुकीच्या तोंडावर त्यांचे प्रामाणिक माणूस... कॉमन मॅन... अशा विविध प्रकारचे बॅनर फ्लेक्स लागल्याने त्यांची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ओळख ही आमदार खासदार नव्हे तर मतदारांच्या हृदयात व गावागावात झाली आहे.

मेहकर मतदार संघात लागलेले हे बॅनर आगामी विधानसभेच्या पार्श्र्वभूमीवर बरेच काही सांगून जात असून एक गोरगरिबांचा मुख्यमंत्री म्हणून मतदार संघात मात्र आतापासूनच चर्चा होऊ लागली आहे. राज्याचा लाडका मुख्यमंत्री तर मतदार संघाचा लाडका आमदार म्हणून डॉ.संजय रायमुलकर यांनीही मतदारसंघातील मतदारांच्या हृदयात जागा मिळवली आहे. त्यामुळे गोरगरीब असो की श्रीमंत अशा प्रत्येकालाच आपल्या राज्याचा लाडका मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांनी आपलेसे करून टाकले आहे. राज्याच्या लाडक्या मुख्यमंत्र्या प्रमाणेच मतदार संघाचा लाडका आमदार म्हणून डॉ.संजय रायमुलकर यांना संबोधले जात आहे. मेहकर मतदार संघात डॉ.संजय रायमुलकर हे गेल्या पंधरा वर्षापासून आमदार म्हणून प्रतिनिधित्व करत आहेत. गेल्या पंधरा वर्षात त्यांनी अनेक विकास कामे केलेली आहेत. तर अवघ्या दोन ते अडीच वर्षाच्या काळात पाचपट कामे करून रेकॉर्ड ब्रेक केला असल्याची चर्चा आहे.

मेहकर मतदारसंघा हजारो कोटींची कामे केल्याने आ.संजय रायमुलकर यांची ओळखही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याप्रमाणेच मतदार संघात झाली आहे. निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर राज्याचे लाडके मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे प्लेस बोर्ड हे कॉमन मॅन... प्रामाणिक माणूस... समाज हितासाठी झटणारा व्यक्ती... दिवसरात्र काम करणारा मुख्यमंत्री... आदी स्लोगनने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आपलेपणांवर शिक्कामोर्तब केले आहे. तर राज्याचे लाडके मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याप्रमाणेच मतदार संघाचे लाडके आमदार म्हणून गेल्या पंधरा वर्षापासून प्रतिनिधित्व करीत असलेल्या संजय रायमुलकर यांनाही प्रत्येक वेळी मतदारांनी प्रेम करून त्यांच्यावर विजयाचा गुलालची उधळण केलेली आहे. त्यांना प्रत्येकवेळी जास्त लीडने राज्याच्या विधानसभेत मेहकर मतदार संघाचे आमदार म्हणून पाठविले आहे.एक सामान्य व्यक्ती शेतकरी कुटुंबातील एक नागरिक या प्रमाणे सात्विक वागणूक असलेल्या आ.संजय रायमुलकर यांनीही मतदारांच्या प्रेमाची जाण ठेवून मतदार संघात हजारो कोटी रुपयांची कामे करून मतदार संघाचा चेहरा मोहरा बदलण्याचे काम केले आहे. मतदारसंघात आतापर्यंत हजारो कोटी रुपयांचे विकास कामे झाले असून मतदारांची संघाचे रुपडे बदलत चालले आहे. भविष्यातही मतदार असेच प्रेम कायम ठेवून या प्रेमातून मतदान रुपी आशीर्वाद देतील असे यावरून दिसून येत आहे.



देविदास खनपटे
मुख्य संपादक



आ.संजय रायमुलकर यांना आता चौथ्यांदा मतदार संघाची प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार असल्याची चर्चाही मतदारसंघात विधानसभा लागण्यापूर्वी होऊ लागली आहे. आ.संजय रायमुलकर हे विजयाचा चौकार लगावतील... महाराष्ट्र राज्याचे लाडके मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारमध्ये सहभागी होतील, मतदार संघातील गावखेड्यापासून ते शहरापर्यंत असलेल्या समस्याही मार्गी लावतील शहराप्रमाणेच गावातही पायाभूत सुविधा निर्माण करतील अशी अशा मेहकर मतदार संघातील मतदारांकडून व्यक्त केली जात असल्याची चर्चा आहे.तर आपल्या कामाच्या बळावर राज्याचे लाडके मुख्यमंत्री यांच्या प्रमाणेच मतदार संघाचे लाडके आमदार म्हणून आ. संजय रायमुलकर यांना कौल मिळणार असल्याचे चित्र मतदार संघात दिसून येत आहे.

## सिद्दीकी हत्या प्रकरणात मोठा ट्विस्ट; अल्पवयीन असल्याचा आरोपीचा खळबळजनक खुलासा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : राष्ट्रवादी अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते बाबा सिद्दीकी यांची शनिवारी रात्री त्यांचे पुत्र झिशान सिद्दीकी यांच्या कार्यालयासमोर गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. या हत्येप्रकरणात मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने दोन मारेकऱ्यांच्या मुसक्या आवळल्या. मात्र तिसरा मारेकरी अद्यापही फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

दरम्यान अटक केलेल्या २ मारेकऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. त्यानंतर रविवारी दुपारी दोन्ही आरोपींना किल्ला कोर्टात हजर करण्यात आले. त्यावेळी त्यातील एका आरोपीने वयाबाबत खुलासा केल्याची माहिती समोर आली आहे.


सुनावणीदरम्यान कोर्टाने वयाबाबत विचारणा करताच आरोपी धर्मराज कश्यपने स्वत:चे वय १७ वर्षे सांगितले. त्याच्या मते तो केवळ १७ वर्षांचा असून या प्रकरणामध्ये त्याला अल्पवयीन म्हणून ग्राह्य धरावे. आरोपीच्या वकिलांनी देखील कोर्टासमोर आरोपीचे वय अल्पवयीन असल्याचा युक्तिवाद केला. तर आधारकार्डनुसार आरोपीचे वय १९ असल्याचा पोलिसांचा दावा आहे. आरोपीच्या वयाबाबत सत्यता तपासण्यासाठी कोर्टाकडून आरोपीचे आधार कार्ड मागवण्यात आले.

## बाबा सिद्दीकी यांच्या पार्थिवावर होणार शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी दिली माहिती

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** :राष्ट्रवादी अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते बाबा सिद्दीकी यांच्यावर दि.१३ ऑक्टोबर रोजी रात्री गोळीबार करून त्यांची हत्या करण्यात आली. मृत घोषित केल्यानंतर त्यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी कूपर रुग्णालयात नेण्यात आला आहे.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री कार्यालयाच्या 'एक्स' या सोशल मीडिया अकाऊंटवरुन पोस्ट केली आहे. माजी राज्यमंत्री बाबा सिद्दीकी यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या आहेत. २००४ ते २००८ या काळात बाबा सिद्दीकी यांनी विविध खात्यांचे राज्यमंत्री व म्हाडाचे अध्यक्ष म्हणून कार्य केल्याचे देखील त्यांनी त्यांच्या या पोस्टमध्ये म्हटले आहे.

### बाबा सिद्दीकी यांचे मारेकरी कायद्याच्या कचाट्यातून सुटणार नाही !

भाजप प्रवक्त्यांचा विश्वास, विरोधकांना सुनावले खडे बोल

**मुंबई/प्रतिनिधी** : बाबा सिद्दीकी यांची झालेली हत्या ही अतिशय वाईट गोष्ट असून, ज्यांनी हे कृत्य केले ते कायद्याच्या कचाट्यातून सुटणार नाही. मात्र विरोधकांनी यावर राजकारण करणे ही बाब अतिशय निंदनीय आहे. असे मत भारतीय जनता पक्षाचे प्रवक्ते आणि माजी केंद्रीय मंत्री सय्यद शाहनवाज हुसेन यांनी व्यक्त केले.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अजित पवार गटाचे बाबा सिद्दीकी यांची आपला मुलगा झीशान सिद्दीकी याच्या ऑफीस बाहेर असताना, काही अज्ञात व्यक्तींनी गोळीबार करत हत्या केली. बाबा सिद्दीकी यांच्या हत्येची जबाबदारी बिश्र्नोई गँगने घेतली आहे. सोशल मीडीयावर माहिती शेअर करत बिश्र्नोई गँगच्या माणसांनी या बद्दल खुलासा केला आहे. भाजप मंत्री सय्यद शाहनवाज हुसेन माध्यमांशी संवाद साधताना म्हणाले बाबा सिद्दीकी ही व्यक्ती खूप चांगली होती. त्यांच्या मृत्यूने आम्हा सगळ्यांना दुःख झाले आहे. या गुन्ह्यामागच्या दोन सुत्रधारांना अटक करण्यात आली असून, पोलिस या संपूर्ण प्रकाराचा तपास करत आहेत, त्यामुळे यात सामील असलेल्या लोकांना शिक्षा होईल. या घटनेमुळे सगळ्यांनाच दुःख झाले आहे. परंतु काँग्रेस आणि उबाठा गटाच्या लोकांनी केलेले विधान हास्यास्पद आहे. अशा घटनेवर राजकारण करणे अत्यंत चुकीचे आहे. भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री मुख्तार अब्बास नक्की यांनी देखील विरोधकांना खडे बोल सुनावले आहे. नक्की म्हणाले इतक्या गंभीर घटनेवर असंवेदनशील प्रतिक्रीया देणे विरोधकांना शोभत नाही.सिद्दीकी यांचा खून ही अतिशय गंभीर बाब आहे. या मागच्या आरोपींना कठोरातली कठोर शिक्षा केली जाईल.

## सलमान खानशी मैत्री भोवणार !

### लॉरेन्स बिश्नोई गँगचा इशारा

नवी दिल्ली : बाबा सिद्दीकी यांच्या हत्येची जबाबदारी लॉरेन्स बिश्नोई गँगने घेतली आहे. पण, याचसोबत सलमान खानला जो कुणी मदत करेल, त्याची सुद्धा हीच अवस्था केली जाईल असा धमकीवजा इशारा सुद्धा बिश्र्नोई गँगने दिला आहे. काही महिन्यांपूर्वी बिश्नोई गँगच्या माणसांनी वांद्रे येथील सलमान खान यांच्या घरासमोर गोळीबार केला होता. या प्रकरणामुळे सलमान खान विरुद्ध बिश्नोई गँग या वादाला पुन्हा तोंड फुटण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



२०२२ मध्ये सिद्धू मुसेवाला या प्रसिद्ध गायकाची हत्या केल्यानंतर बिश्नोई गँगची चर्चा व्हायला लागली. १९९८ साली सलमान खानच्या हम साथ साथ हैं या चित्रपटाच्या शूटींग दरम्यान, सलमान खानवर काळवीट मारल्याचा आरोप केला गेला होता. काळवीट बिश्नोई समाजासाठी आस्थेचा विषय असल्यामुळे बिश्नोई समाजातील लोकांच्या भावना दुखावल्या गेल्या. २०१८ साली लॉरेन्स बिश्नोई याने म्हटले की सलमान खानला याच किंमत चुकती करावी लागेल. आम्ही त्याला जोधपुर मध्ये मारु. या प्रकरणानंतर सलमान खानशी निकटचे संबंध असलेल्या २ सेलिब्रिटीसची हत्या करण्यात आली होती. २०२३ च्या नोव्हेंबर महिन्यात पंजाबी गायक गिप्पी ग्रेवाल याची बिश्नोई गँगकडून कॅनडामध्ये हत्या करण्यात आली होती. यावर स्पष्टीकरण देताना त्यांनी म्हटले की, ग्रेवाल याने सलमान खान याला भावासारखी वागणूक दिली होती. त्यानंतर या वर्षी सप्टेंबर महिन्यात पंजाबी गायक एपी धिल्लन याची सुद्धा हत्या करण्यात आली होती. धिल्लन याने आपल्या गाण्यात सलमान खानला घेतल्यामुळे त्याची हत्या झाल्याचे बोलले जात आहे.

या पार्श्र्वभूमीवर सलमान खानच्या घराभोवती सुरक्षेची वाढ करण्यात आली आहे. कुठल्याही प्रकारचे अघटित घडू नये म्हणून मलाबार हिल या ठिकाणी देखील सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे. ४८ वर्ष काँग्रेस मध्ये असणारे बाबा सिद्दीकी यांनी या वर्षीच अजित पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षात प्रवेश केला आहे.

### बाबा सिद्दीकी हत्येप्रकरणी राहुल गांधी यांची प्रतिक्रिया...

**मुंबई/प्रतिनिधी** : माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे नेते बाबा सिद्दीकी यांच्यावर शनिवारी (१२ ऑक्टोबर) रात्री गोळीबार झाल्यानंतर देशभरात पडसाद उमटले आहेत. तीन अज्ञातांनी केलेल्या गोळीबारात सिद्दीकी यांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाल्याचं बघायला मिळतंय. तसंच वाय दर्जाची सुरक्षा असतानाही ही घटना घडली. त्यामुळं विरोधकांकडून सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला जातोय.




## संविधान संपवण्याचे काम काँग्रेसने केले

### केंद्रीय मंत्री किरण रिजिजू यांचा पत्रकार परिषद आरोप

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधी** : काँग्रेसने मुस्लिमांचा वापर फक्त ओल बँक म्हणून केला आहे. आणि संविधान संपूर्ण चे कामही काँग्रेसनेच केले आहे असा आरोप केंद्रीय मंत्री किरण रिजिजू यांनी केला ते छत्रपती संभाजीनगर येथे दि. १३ ऑक्टोबर रोजी आयोजित पत्रकार परिषदेमध्ये बोलत होते. यावेळी केंद्रीय मंत्री किरण रिजिजू यांनी, संविधान मिटवण्याच्या मुद्द्यावरून काँग्रेसला तिखट सवाल केले, काँग्रेसने बाळासाहेबांना नाकारलं होतं, आम्ही प्रत्येक जिल्ह्यात संविधान निर्माण भवन उभे करणार आहोत.

२६ नोव्हेंबर रोजी मोठ्या उत्साहात संविधान दिवस साजरा करणार आहोत. बाबासाहेबांचे स्मारक उभारणार आहोत. अशा वेगवेगळ्या घोषणा त्यांनी आज संभाजीनगरमध्ये केल्या. तर काँग्रेसने मुस्लिमांना फक्त वोट बँक म्हणून पाहिले आहे असा आरोप देखील त्यांनी काँग्रेसवर केला. सबका साथ सबका विकास मोदीचे हे ब्रीद वाक्य आम्ही घेऊन महाराष्ट्रामध्ये काम करतोय. मुस्लिमांना मतदानासाठी काँग्रेसने प्राधान्य दिले आहे.मुस्लिमांना व्होट बँक बनवून काँग्रेस मुस्लिमांना धोका देत आहे.बौद्ध समाज जास्त प्रमाणात महाराष्ट्रात आहे. मी पण हिमाचल मधील बौद्ध आहे.काँग्रेसने जे वाईट करून ठेवले आहे ते चांगले करायचे आहे. महाराष्ट्रात सर्व जातींना आम्ही समोर घेऊन जात आहोत. सर्वात जास्त मदत करायची गरज आहे, ती लेण्यांना आम्ही त्यांना आर्थिक सहाय्य करू,महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्यात संविधान निर्माण भवन उभारणार आहे. संविधान सर्वात मोठे आहे. देशात काही लोक चुकीची माहिती पसरवत आहे. बाबासाहेबांना जे मानत नाही ते आता संविधान वर बोलत आहे. संविधान संपवण्याचे काम काँग्रेसने केले. असा आरोप केंद्रीय मंत्री किरण रिजिजू यांनी केला.



काँग्रेसच्या संविधान मिटवण्याच्या एक नेरेटीव्हवर किरण रीजुजू यांचे महाराष्ट्र आणि देशात काम सुरू असल्याचे पत्रकार परिषदेतून स्पष्ट होत आहे.

## ई कचऱ्याविषयी जागरूकता हवी

आज १४ ऑक्टोबर, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक ई कचरा दिवस म्हणून साजरा केला जातो. ई कचरा कमी करणे आणि ई कचऱ्याचा पुनर्वापर या बाबत जनजागृती करणे हा या दिवसा मागचा उद्देश आहे. २०१८ साली पहिल्यांदा जागतिक कचरा दिवस साजरा करण्यात आला. पर्यावरण आणि मानवी आरोग्यासाठी धोकादायक असलेला ई कचरा ही जगातील आज सर्वात मोठी समस्या बनली आहे. आपल्या रोजच्या जगण्यामध्ये इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल सेवांचा वापर जसा वाढत चालला आहे तसतसा इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा डोंगरही वाढत चालला आहे. उपयुक्तता संपलेल्या आणि तांत्रिक बिघाडामुळे वापरण्यायोग्य नसलेल्या वस्तू फेकून दिल्या जातात आणि मग त्याचा ई कचरा बनतो. फक्त महाराष्ट्राचा विचार केला तर महाराष्ट्रात दरवर्षी ५० हजार टन हून अधिक ई कचरा जमा होतो तर देशात ५ लाख टन ई कचरा वर्षाला तयार होतो. महाराष्ट्र खालोखाल आंध्र प्रदेश, तामिळनाडू, उत्तर प्रदेश आणि पश्र्चिम बंगाल या राज्यात सर्वाधिक ई कचरा तयार होतो. आपल्या देशातच इतका ई कचरा तयार होत असेल तर जगात किती ई कचरा तयार होत असेल याचा विचार न केलेलाच बरा. ई कचऱ्याची समस्या इतकी गंभीरपणे आ वासून उभी असतानाही आपण ई कचऱ्या विषयी जागृत नाही. काहींना तर ई कचरा म्हणजे काय हे देखील माहीत नाही. ई कचरा म्हणजे तुमच्या आमच्या घरातील निकामी झालेल्या किंवा वापरात नसलेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तू ज्या सहजपणे आपण इतर कचऱ्यासोबत बाहेर फेकतो. या कचऱ्याचा निचरा देखील आपण इतर कचऱ्या प्रमाणेच करतो. घरगुती वापरातील टीव्ही, टेप, रेडिओ, टू इन वन, फ्रिज, मिक्सर, वॉशिंग मशीन, कुलर, एअर कंडिशनर, इलेक्ट्रॉनिक कुकर, मायक्रोव्हेव, ओव्हन, हीटर, पंखे यासारख्या इलेक्ट्रॉनिक वस्तू निकामी झाल्या की त्याला ई कचरा असे संबोधले जाते. यासोबतच महिती तंत्रज्ञान क्षेत्रातील उपकरणे जसे संगणक, लॅपटॉप, टॅब, फोन, मोबाईल, बॅटरी, सर्किट बोर्ड, हार्ड डिस्क, पेन ड्राईव्ह, सिडी, व्ही सिडी यांचा ई कचऱ्यात समावेश होतो. अशा प्रकारे निकामी झालेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंना ई कचरा असे म्हणतात. इलेक्ट्रॉनिक वस्तूंमध्ये भरपूर प्रमाणात सजीवांना अपायकारक घटक असतात. हे अपायकारक घटक पर्यावरणातील हवा, मती आणि पाण्यात मिसळले की सभोतालची हवा, पाणी आणि माती दूषित होती. मोबाईलची किंवा कोणत्याही बॅटरीची निर्मिती शिसे वापरून केली जाते. हे शिसे पावसाच्या पाण्यात झिरपून हवेतील आर्द्रतेमध्ये मिसळून संबंधित हवा, पाणी आणि दूषित होते. अमेरिकेतील एका पर्यावरण संवर्धन संस्थेच्या म्हणण्यानुसार दरवर्षी ३० दशलक्ष संगणक निकामी झाले की फेकून दिले जातात. यापैकी वीस टक्क्यांहून कमी संगणकाचे पूनार्विनिकरण केले जात नाही. युरोपमध्ये तर दरवर्षी सुमारे १०० दशलक्ष फोन फेकून दिले जातात. कालबाह्य ठरलेली, निकामी झालेली ही उपकरणे पर्यावरणातील जागा वेगाने व्यापत आहेत. निष्काळजीपणे फेकलेल्या काही उपकरणांमध्ये बोरोलियम, कॅडीमियम, पारा आणि शिसे यासारखी घातक घटक असतात. या घटकांना वातावरणात संमिश्र होण्यास अवकाश लागत असला तरी खूप जास्त प्रमाणात जेंव्हा हे वातावरणात मिसळले जातात तेंव्हा पर्यावरणाची मोठी हानी होते. एकूणच ई कचऱ्यामुळे पर्यावरणाची मोठी हानी होत आहे. हे लक्षात घेता ई कचऱ्याच्या समस्येवर वेळीच आणि गांभीर्याने विचार करण्याची नितांत गरज आहे. ई कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी विशिष्ट प्रक्रिया अवलंबणे आवश्यक आहे. त्याचा निचरा इतर कचऱ्यासोबत न करता त्याचा निचरा करण्यासाठी भिन्न प्रक्रिया राबवली पाहिजे. ई कचऱ्याचे नियोजन आणि विल्हेवाट लावण्याच्या प्रक्रियेत या कचऱ्याचे संकलन त्याचे रिसायक्लिंग आणि त्याचे मॅन्यूफॅक्चरिंग महत्वाचे आहे. त्यासाठी सार्वजनिक व खाजगी क्षेत्राने संयुक्त रुपात पायाभूत सुविधा उभाराव्या लागतील. पर्यावरण मंत्रालयाने सादर केलेल्या ई कचरा व्यवस्थापन नियम २०२२ च्या मसुद्यात ई कचरा व्यवस्थापनामध्ये उत्पादक, पुनर्वापर संस्था आणि संघटना सर्वांची जबाबदारी निश्र्चित केली गेली आहे. ती जबाबदारी प्रत्येक घटकाने पार पाडल्यास काही प्रमाणात ही समस्या मिटेल.

# माझ्या मुलापेक्षाही मला जनता प्रिय, पंकजा मुंडे यांची जनतेला भावनिक साद

## प्रथमच धनंजय मुंडे दसरा मेळाव्याच्या व्यासपीठावर

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** स्व. गोपीनाथ मुंडे यांनी जाता जाता माझ्यावर तुमची जबाबदारी दिली आहे. मला माझ्या मुला पक्षाही तुम्ही प्रिय आहात. अशी भावनिक साद घातली तर काहीही झालं तरीही मी तुम्हाला सोडणार नाही आणि तुम्हीही मला सोडणार नाही'', असा विश्र्वासही त्यांनी यावेळी दिला. भक्ती आणि शक्तीचा संगम असलेल्या व भाविकांना लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या जन्मगावी सावरगाव येथे दि.१२ ऑक्टोबर रोजी पारंपारिक दसरा मेळावा संपन्न झाला. यावेळी त्या बोलत होत्या.पंकजा मुंडे यांच्या दसरा मेळाव्याची सुरुवात झाल्यापासून बहुदा या वर्षी प्रथमच त्यांचे बंधू आणि कृषिमंत्री





### धनंजय मुंडे सह विविध मान्यवरांची उपस्थिती

संत भगवान बाबा यांचे जन्मगाव असलेल्या सावरगाव येथे आमदार पंकजा मुंडे यांचा पारंपारिक दसरा मेळावा लाखोंच्या उपस्थितीत पार पडला या कार्यक्रमाला पंकजा मुंडे यांचे भाऊ कृषी मंत्री धनंजय मुंडे हे बहुदा दसरा मेळावा सुरू झाला तेव्हापासून पहिल्यांदाच या व्यासपीठावर एकत्र आले. तसेच यावेळी सुजय विखे यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती होती.संपूर्ण महाराष्ट्रातून आलेल्या मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.

धनंजय मुंडे या दसरा मेळाव्याच्या व्यासपीठावर एकत्र आले हे विशेष. यावेळी पंकजा मुंडे दसऱ्याच्या निमित्ताने संबोधन करताना त्यांनी आपल्या भाषणाची सुरुवात शेरो-शायरीतून केली. त्या शायरीतून मनोज जरांगेंना टोलाही लगावला. त्या पुढे म्हणाल्या की, मला गोपीनाथ मुंडेंनी त्यांचा वारसा दिला. मी भगवान भक्तीगड निर्माण केला. मुलगा आर्यमन भगवानबाबांच्या दर्शनाला आलाय. माझ्या मुलापेक्षा माझी जनता मला प्रिय आहे. या मेळाव्याला १८ पगड जातीचे लोकं आलेले आहेत. त्या सगळ्यांना मी दरवर्षी साष्टांग दंडवत घालते. कारण माझ्या वडिलांनी जाताना माझ्या झोळीमध्ये तुमची जबाबदारी टाकली आहे. तुम्ही मला जिंकवलं, त्यामुळे मान, सन्मान मिळाला. पण माझा पराभव झाल्याने त्यापेक्षा मला जास्त इज्नत दिली''आहे.आता तुम्हा सर्वांना इज्नत देण्यासाठी महाराष्ट्राच्या गावागावांत आणि कानाकोपऱ्यात राज्याच्या दौऱ्या करणार आहे. आपल्याला आपला डाव खेळायचाय आहे. हा कार्यक्रम शासनाचा नाही किंवा लाभार्थी संमेलन नाही. हा कार्यक्रम ज्यांना काही नकोय, कुणाला काही लाभ नाही त्यांचा कार्यक्रम असल्याचे पंकजा मुंडे यांनी तसेच दसरा मेळाव्याची परंपरा पुढे सुरूच राहणार असून आपण शांततेत घरी जावे, वाहने हळू चालवावे, असे आवाहन पंकजा मुंडे यांनी कार्यकर्त्यांना केलं आहे.

# तुमच्या ऋणातून उतराई होणे शक्य नाही

## मी मतदार संघाला एक परिवार समजतो आमदार संजय रायमुलकर यांचे प्रतिपादन

दैनिक आपला विदर्भ

**लोणार/प्रतिनिधी :** मेहकर लोणार तालुक्यातील जनतेने माझ्यावर नेहमीच भरभरून प्रेम केले आहे. त्यांच्या ऋणातून उतराई होणे शक्य नाही. त्यांना दिलेला शब्द मी पाळतो. म्हणूनच लोकांनीही भरभरून प्रेम दिले, असे मत आ.संजय रायमुलकर यांनी व्यक्त केले. ते लोणार तालुक्यातील चिंचोली सांगळे येथे आयोजित देवी उत्सवात बोलत होते. तालुक्यातील चिंचोली सांगळे येथील नवरात्रोत्सवाची दि.१३ ऑक्टोबर रोजी महाप्रसाद वितरणाने सांगता झाली.यावेळी प्रमुख अतिथी म्हणून आमदार संजय रायमुलकर यांची उपस्थिती होती. तर,शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बळीराम मापारी, विजय सानप,शहर प्रमुख पांडुरंग सरकटे, विश्र्वंभर दराडे यांची उपस्थिती होती. यावेळी देहू येथील गौरी सांगळे यांचे कीर्तनाचा कार्यक्रम झाला. गणेश सांगळे, सतीश सांगळे, अर्जुन सांगळे ,बाजार



समिती संचालक विठ्ठलराव जाधव यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. देवी संस्थानच्या वतीने विश्र्वस्त संतोष सांगळे, राजीव ओंकारराव सांगळे यांनी आमदार रायमुलकर यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार केला. यावेळी सत्काराला उत्तर देताना आ. संजय रामुलकर म्हणाले की,संपूर्ण मतदारसंघ हा मी एक परिवार समजतो. येथील प्रत्येक गावचा सर्वांगीण विकास करणे हे माझे कर्तव्य आहे. दोन्ही तालुक्यांमध्ये ३ हजार ९०० कोटींची विकासकामे केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहेत. मी वेळोवेळी अनेकांना मदत केली, पण त्याची प्रसिद्धी करण्याच्या फंदात पडलो नाही. देवी मंदिरासाठी भविष्यात सभा मंडप बांधण्यात येईल व पुढील कार्यक्रम त्याच सभामंडपात होईल,अशी घोषणा त्यांनी केली. तर यावेळी टाळ्यांच्या गजरात भाविकांनी आ. संजय रायमुलकर यांचे स्वागत केले. यावेळी प्रा. बळीराम मापारी यांनही मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमाला माऊली जायभाये, गजानन जायभाये, जितेंद्र थोरवे ,विशाल थोरवे, प्रमोद थोरवे, पंढरी मानवतकर,संतोष बोडखे आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन नंदकिशोर सांगळे यांनी केले.यावेळी हजारो नागरिकांची उपस्थिती होती.

## कामक्षा देवी माध्यमिक विद्यालयांचा शुभम शिरसाठ कुस्ती स्पर्धेत राज्यस्तरावर



दैनिक आपला विदर्भ

**किनगाव राजा/प्रतिनिधी :** किनगांव राजा येथील कामक्षा देवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील शुभम रवींद्र शिरसाठ ह्याने विभागीय स्तरावर झालेल्या शालेय कुस्ती स्पर्धेत प्रथम येवुन राज्य स्तरावर होणाऱ्या कुस्ती स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे.ता.११ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्र राज्यक्रीडा संचलनालय पुणे यांच्या मार्फत तालुका संकुल पुसद जि.यवतमाळ या ठिकाणी विभागीय कुस्ती स्पर्धे चे आयोजन करण्यात आले होते.शुभम रवींद्र शिरसाठ १७ वर्षे वयोगटामध्ये ६० किलो वजन गटामध्ये प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे.विभागीय स्तरावर झालेल्या ६० किलो वजन गटामध्ये ५ जिल्ह्यातील ७ मल्ल सहभागी झाले होते. शुभम शिरसाठ याने वाशिम, यवतमाळ व अमरावती जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या मल्लाला हरवून विजय संपादन केला आहे. शेवटच्या कुस्ती अमरावतीच्या मल्ला सोबत असल्यामुळे दोन्ही मल्ल तुल्यबळ असल्यामुळे रोमहर्षक कुस्तीची लढत होऊन विजय प्राप्त केला आहे.


यावेळी कुस्ती प्रशिक्षक सुनील काकड क्रीडा शिक्षक नितीन खरात,गजानन काळुसे,आत्ताम पठाण आदीजन उपस्थित होते,श्री.संत गजानन महाराज बहुउद्देशिय संस्थेचे अध्यक्ष शिवाजीराव काळुसे प्राचार्य उद्धव दराडे यांच्यासह शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# सिंघम अगेन स्टार अजय देवगण, रोहित शेट्टी, करीना कपूर यांनी केले रावण दहन


## दसरा सणानिमित्त फिल्मी व्यक्ती आणि राजकारण्यांनी पुतळ्याचे दहन केले

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** लाल किल्ला मैदानावर आयोजित रावण दहन कार्यक्रमाला प्रसिद्ध बॉलिवूड स्टार सिंघम अगेन अजय देवगण, प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक रोहित शेट्टी, अभिनेता खासदार मनोज तिवारी चित्रपट अभिनेत्री करीना कपूरसह सेलिब्रिटी व राजकीय मान्यवरांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. यावेळी प्रसिद्ध लवकुश रामलीला समितीचे अध्यक्ष अर्जुन कुमार यांनी दसरा सणानिमित्त संपूर्ण देशवासियांना शुभेच्छा देताना सांगितले की, दसरा हा दुष्टाईवर सत्याच्या विजयाचे प्रतीक असल्याचे सांगितले. या सोबतच या चार प्रसिद्ध तारकांनी भगवान श्री रामाला तिलक लावला आणि प्रभूच्या चरणांची पूजा करून त्यांच्याकडून आशीर्वाद घेतला. मंचावर लीला समितीचे प्रमुख अर्जुन कुमार यांनी या चित्रपट







कलाकारांना गदा, शक्तीचे प्रतीक आणि भगवान श्री राम यांची मूर्ती व सन्मानचिन्ह देऊन सन्मान केला. अजय देवगण, करीना कपूर, रोहित शेट्टी, खासदार मनोज तिवारी, अर्जुन कुमार यांच्यासह मंचावर उपस्थित समितीच्या अधिकाऱ्यांनी जय श्री राम, जय श्री रामचा जयघोष केला. तेव्हा संपूर्ण लीला मैदान लाल किल्ला राममय झाला होता. सर्वांनी मिळून बाण सोडले आणि रावण, कुंभकरण आणि मेघनाद यांच्या पुतळ्यांचे दहन केले. लीलास्थळी आलेल्या सर्व महिला, लहान मुले, वृद्ध आणि राम भक्तांनी फिल्म स्टारच्या साक्षीने दसरा सण मोठ्या आनंदात साजरा केला. समितीचे अध्यक्ष अर्जुन कुमार यांनी दिलेल्या माहितीनुसार, गणेश वंदना, रावणाकडून शंकराची पूजा, चंद्रहास तलवारीचा पाडाव, राम-रावण युद्ध, रावण वध आणि त्यानंतर रावण, कुंभकरण, कुंभकरण यांच्या पुतळ्याचे दहन केले.या दसरा उत्सवात १२०-११०-१०० फूट उंचीचे रावण, कुंभकरण मेघनादाचे पुतळे महिला, लहान मुले, वृद्ध आणि राम भक्तांचे आकर्षणाचे केंद्र होते, जेव्हा रावणाच्या पुतळ्यावर बाण सोडला गेला तेव्हा नाभीतून अमृत पडले, डोळ्यांतून रक्ताचे अश्रू वाहत होते. हातात तलवारी गळ्यात वेगवेगळ्या रंगीबेरंगी माळा फिरताना दिसत होत्या. तोंडातून हे राम, हे राम अशा घोषणा देत पुतळे जाळण्यात आले. याच लीलास्थळी रावण, कुंभकरण आणि मेघनाद यांच्या पुतळ्यांशिवाय कोलकत्ता येथील महिला डॉक्टरवर अत्याचार करणाऱ्या अत्याचारितांचा चौथा पुतळाही दहन करण्यात आला. या कार्यक्रमात लीला समितीचे सरचिटणीस सुभाष गोयल, संरक्षक धरमपाल सिंगला, मनजीत सिंग सचदेवा, अध्यक्ष पवन गुप्ता, वरिष्ठ उपाध्यक्ष सत्यभूषण जैन, सौरव गुप्ता, सतीश यांच्यानंतर लोहिया, दिनेश जैन, रवीश अग्रवाल, संदीप भूटानी, भाई मेहरबान, प्रवीण गोयल, कोषाध्यक्ष अंकुर गोयल, लीला मंत्री प्रवीण सिंघल, राजेश वर्मा, गौरव सुरी, राजकुमार गुप्ता, वीरू सिंधी, लोकेश बन्सल, अशोक कटारिया, दीनानाथ सोनकर, मदन अग्रवाल, अखिल गोयल, मुकुल गुप्ता, निशांत गुप्ता, सुनील कुमार, संजय वर्मा, औदार्य गुप्ता,राहुल गुप्ता, राजकुमार कश्यप, अतुल गोयल आदी सर्व अधिकाऱ्यांनी सर्व पाहुण्यांचा सत्कार केला आणि प्रभू श्री रामाची आरती व पायपूजन करून लीला समाप्त झाली.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# महावितरणचा भोंगळ कारभार नागरिकांच्या जीवावर

## वरिष्ठांचेही दुर्लक्ष : मुख्य रस्त्यावरील रोहित्राने घेतला पेट

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** तालुक्यातील सर्वात मोठी बाजारपेठ असलेल्या डोणगावमध्ये मात्र महावितरणच्या भोंगळ कारभाराने नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे. डोणगावमधील अनेक विद्युत रोहित्र व रोहित्राचे फेजबॉक्स हे उघडे असल्याने नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. हा प्रकार अनेक वर्षापासून सुरू असताना आज दि.१३ ऑक्टोबर रोजी रात्री दरम्यान रोहित्रावर फॉल्ट झाल्याने ठिणग्या पडल्या. त्यानंतर रोहितच्या फेजबॉक्स ने पेट घेतला. या घटनेत कोणताही हानी झाली नसली तरी भविष्यात मात्र हानी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे महावितरणचा भोंगळ कारभार नागरिकांच्या जीवावर उठण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

मेहकर विधानसभा मतदार संघातील डोणगाव हे ३० ते ३२ गावांची मुख्य बाजारपेठ आहे. तर डोणगाव हे नेहमीच


महावितरणच्या भोंगळ कारभाराने नागरिकांचा जीव धोक्यात

महावितरणच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना पडला कर्तव्याचा विसर : वरिष्ठांनी लक्ष देण्याची गरज

दैनिक आपला विदर्भ


डोणगाव/प्रतिनिधी : जिल्ह्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत, मेहकर विधानसभा मतदार संघातील व जवळपास ३२ गावांची महत्वाची बाजारपेठ अशी ओळख असलेल्या डोणगावमध्ये मात्र समस्यांचा डोंगर उभा आहे. तर भरीत भर म्हणून महावितरणच्या भोंगळ कारभाराने तर नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे. डोणगावमधील अनेक विद्युत रोहित्रांचे फेजबॉक्स हे उघडे असल्याने नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. याकडे महावितरणच्या अधिकारी व कर्मचार्यांचे अक्षम्य दुर्लक्ष असल्याने नागरिकांमध्ये तीव्र रोष व्यक्त केला जात आहे. याकडे वरिष्ठांनी लक्ष देऊन डोणगावमधील उघडे रोहित्रांचे फेसबॉक्स नव्याने बसवावे अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. मेहकर विधानसभा मतदार संघातील डोणगाव हे ३२ गावांची मुख्य बाजारपेठ आहे. तर

डोणगावमध्ये समस्या पाचवीलाच

-दत्तात्रय पळसकर नागरिक डोणगाव

-अमोल सुभाष पळसकर गावकरी

शासकीय अधिकारी व कर्मचर्यांच्या उदासीन धोरणामुळे या ना त्या कारणाने चर्चेत राहते. आता तर महावितरण कंपनीने दुर्लक्षीतपणाचा कळस गाठला असून येथे अजब गजब कारभार पहायला मिळत आहे. डोणगाव येथे ३३ केव्ही चे महावितर कंपनीचे उपकेंद्र आहे. नागरिकांना सुविधा मिळावी, यासाठी कोट्यवधींचा खर्च करून या ठिकाणी उपकेंद्र उभारले आहे. यावर महिल्याला लाखो रुपये खर्च करून अधिकारी व कर्मचार्यांची नियुक्ती केली आहे. मात्र, अधिकारी व कर्मचार्यांना आपल्या कर्तव्याचा विसर पडल्याने डोणगावमध्ये विद्युत संदर्भात अनेक समस्या दिवसेन दिवस वाढत आहेत.या रोहित्रामुळे व उघड्या फेजबॉक्समुळे अनुचित प्रकार घडण्याची भिती स्थानिक नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. अनुचित प्रकार घडल्यास याला जबादार कोण असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. आज दि.१३ ऑक्टोबर रोजी रात्री सात ते आठ वाजताच्या दरम्यान शहरातील मुख्य रस्त्यावरील रोहित्रावर फॉल्ट झाल्याने विजेच्या ठिणग्या खाली पडल्या आणि फटाके फोडल्यासारखा प्रचंड मोठा आवाज झाला. हा प्रकार तब्बल एक मिनिट सुरू राहिला. या आवाजाने मात्र आजूबाजूच्या नागरिकांमध्ये भीती निर्माण झाली. नंतर या रोहितच्या फेजबॉक्स ने पेट घेतल्याचे पाहायला मिळाले. सुदैवाने या घटनेत कोणतेही हानी झाली नाही, मात्र भविष्यात रोहित्राचा हा प्रकार असाच कायम राहिल्यास हानी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.त्यामुळे वरिष्ठांनी याकडे लक्ष देऊन येथील कामचुकार अधिकारी व कर्मचार्यांकडून सदर रोहित्रांची दुरुस्ती करून ते सुरक्षीत करावे तसेच रोहित्राच्या उघड्या फेजबॉक्सला नवीन



बॉक्स लावून लॉक लावावे, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

## बाबा सिद्दीकी हत्या: पोलिसांसमोर काय आव्हाने असणार, ॲड. उज्वल निकम यांनी सांगितली कायदेशीर बाजू

**मुंबई/प्रतिनिधी :** माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांच्यावर शनिवारी (दि. १२ ऑक्टोबर) गोळीबार करून त्यांची हत्या करण्यात आली. यामुळे महाराष्ट्रासह संपूर्ण देशभरात खळबळ उडाली. तीन टर्म आमदार आणि मंत्री राहिलेल्या एका महत्त्वाच्या आणि अल्पसंख्याक नेत्यावर अशाप्रकारे हल्ला झाल्यामुळे राज्य सरकारवर टीका होत आहे. यावर आता सरकारी वकील आणि उत्तर पश्चिम लोकसभा निवडणूक लढविणारे उमेदवार उज्ज्वल निकम यांनी प्रतिक्रिया दिली आहे. बाबा सिद्दीकीच्या हत्येची बातमी ऐकून मला धक्का बसला. मी या घटनेचा निषेध करतो. बाबा सिद्दीका यांना घटनेच्या काही दिवस आधी धमकी मिळाली होती, त्यामुळे पोलिसांनी त्यांना संरक्षणही देऊ केले होते. मात्र दसरा आणि नवरात्रीच्या मिरवणुकीचा फायदा घेऊन हल्लेखोरांनी भ्याड हल्ला केला.

उज्ज्वल निकम पुढे म्हणाले, तीन हल्लेखोर होते, असे सकृतदर्शनी दिसत आहे. त्यापैकी दोन हल्लेखोरांना अटक झाली आहे, तर तिसऱ्याचा शोध सुरू आहे. आता पोलिसांना हत्येचा कट कुणी रचला, हे शोधावे लागेल.

## कै. हरिश्चंद्र काटे यांच्या चतुर्थ पुण्यस्मरणार्थ अनाथाश्रम बिबी येथे फळ वाटप



दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** पलसिद्ध कंट्रक्शनचे सर्वेसर्वा कै. हरिश्चंद्र काटे यांच्या चतुर्थ स्मरणार्थ निमित्त बिबी येथील मातोश्री अनाथ वृद्धाश्रम येथे अनाथ वृद्धांना फळ वाटप करण्यात आले तसेत ग्रामीण रुग्णालय बिबी येथील रुग्णांना ही फळ वाटप करण्यात आले त्या नंतर रुग्णालय परिसरात वृक्षारोपण केले सलग चार वर्षे पासून अनेक सामाजिक उपक्रमांनी हा पुण्यतिथीचा कार्यक्रम पलसिद्ध कंट्रक्शन चे कर्मचारी सामाजिक उपक्रमांनी साजरा करत असतात. यावेळी पलसिद्ध कंट्रक्शन चे समस्त कर्मचारी राधेश्याम जाधव,अनिल बोरकर,दयानंद काटे,कार्तिक मापारी, अजय खंडारे,नागेश गायकवाड,नबबी पठाण, अंकुश गायकवाड, रविंद्र देशपांडे,संजय लांडगे,मुसाभाई,राजू खंडारे,सह मातोश्री अनाथ वृद्धाश्रम चे संचालक डॉ दगडुबा गायके, त्यांचा कर्मचारी स्टाफ ग्रामीण रुग्णालयातील डॉ इंगोले सह सर्व स्टाफ उपस्थित होता

## ‘एसटी’ आरक्षण अंमलबजावणीच्या ’जीआर’साठी सकल धनगर समाजातर्फे ढोल वादन आंदोलन

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** धनगर समाजाच्या हक्काचे अनुसूचित जमातीचे (एसटी) आरक्षण तातडीने लागू करण्याचा शासन निर्णय उद्याच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत काढावा, या मागणीसाठी सकल धनगर समाजातर्फे रविवारी पुण्यात ढोल वादन आंदोलन करण्यात आले. सारसबागजवळील पुण्यश्र्लोक अहिल्याबाई होळकर पुतळ्याला अभिवादन करून धनगर समाजबांधवांनी एसटी आरक्षण लागू करण्याची मागणी केली. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला हा निर्णय घेतला नाही, तर उग्र स्वभावाचा धनगर समाज महायुती सरकारचे दहन केल्याशिवाय राहणार नाही, असा सूचक इशारा समन्वयक ॲड. विजय गोफणे यांनी दिला.



पुणे, पिंपरी-चिंचवड परिसरातील शेकडो धनगर बांधव, भगिनी यामध्ये सहभागी झाले होते. ॲड. विजय गोफणे, सोमनाथ देवकाते, अनिकेत कवाने, डी. बी. नाईक, मधुसूदन बरकडे, योगेश खरात, महादेव वाघमोडे, विष्णुदास गावडे, सुनंदा गडदे, पिंटू कोकरे, भरत गुरव, डॉ. सुधाकर न्हाळदे, खंडू तांबडे यासह अन्य धनगर बांधव उपस्थित होते.

ॲड. विजय गोफणे म्हणाले, राज्यघटनेने धनगरांना एसटी प्रवर्गात आरक्षण दिलेले आहे. मात्र, राज्य सरकारकडून त्याची अंमलबजावणी केली जात नाही. आजवर अनेकदा धनगर समाजाची फसवणूक झाली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शब्दाला जगणारे नेते आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून आम्हाला अपेक्षा आहे. त्यामुळे उद्याच्या मंत्रिमंडळ बैठकीचे यासंदर्भातील शासन निर्णय काढून मुख्यमंत्र्यांनी धनगर समाजाला दिलेला शब्द खरा करावा. तसे झाले, तर येत्या निवडणुकीत राज्यातील दोन कोटी धनगर समाज त्यांच्या पाठीशी राहील.

आचारसंहिता लागण्यापूर्वी महायुती सरकारने हा निर्णय घेतला नाही, तर विधानसभा निवडणुकीत धनगर समाज आपली ताकद दाखवून देईल. राज्यातील ८० ते ९० मतदारसंघात धनगर समाजाची निर्णायक भूमिका राहणार आहे. तर ७० ते ८० मतदारसंघात ५० ते ६० हजारांचे मतदान धनगर समाजाचे आहे. त्यामुळे महायुती सरकारने धनगर समाजाचा पाठिंबा मिळवायचा, की समाजाचा रोष ओढवून घ्यायचा, हे मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व मंत्रिमंडळाने ठरवावे, असे गोफणे म्हणाले.

## निवडणुकीच्या तोंडावर महाविकास आघाडीकडून ’गद्दारांचा पंचनामा’ प्रकाशित!

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यामध्ये विधानसभा निवडणूक कार्यक्रम कोणत्याही क्षणी जाहीर होण्याची शक्यता असतानाच आज (१३ ऑक्टोबर) महाविकास आघाडीकडून महायुती सरकारविरोधात गद्दारांचा पंचनामा प्रकाशित करण्यात आला. महाविकास आघाडीकडून संयुक्त पत्रकार परिषद घेण्यात आली. या पत्रकार परिषदेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, खासदार सुप्रिया धुळे, संजय राऊत उपस्थित होते. यावेळी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी महायुती सरकारवर घणाघाती प्रहार केला.

## संक्षिप्त...

### भिवंडीतील वालशिंद गावात स्वर्गीय रतन टाटा वाचनालयाचे उद्घाटन




दैनिक आपला विदर्भ

**भिवंडी/प्रतिनिधी :** वालशिंद ग्रामपंचायतच्या वतीने, स्वर्गीय रतन टाटा यांच्या नावाने उभारण्यात आलेल्या वाचनालयाचे उद्घाटन मोठ्या उत्साहात करण्यात आले. या वाचनालयासाठी तब्बल २० लाख रुपयांचा निधी वापरण्यात आला आहे, जो स्थानिक ग्रामपंचायतने मंजूर केला होता.

स्वर्गीय रतन टाटा, देशातील एक प्रतिष्ठित उद्योगपती, यांचे नुकतेच निधन झाल्यामुळे संपूर्ण देश शोकमग्न झाला. त्यांच्या स्मृतींना आदरांजली म्हणून वालशिंद ग्रामस्थांनी त्यांच्या नावाने वाचनालय सुरू करण्याचा निर्णय घेतला. समाजात त्यांनी दिलेले महत्त्वपूर्ण योगदान आणि त्यांची उदार मनोवृत्ती लक्षात घेता, हे वाचनालय त्यांचे स्मरण कायम ठेवणारे एक महत्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

या वाचनालयाच्या उद्घाटन सोहळ्याला शिवसेना ठाकरे गटाचे भिवंडी लोकसभा संपर्कप्रमुख आणि माजी आमदार रुपेश म्हात्रे यांनी प्रमुख पाहुणे म्हणून हजेरी लावली. तसेच, ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच आणि गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नैतिक जबाबदारी स्वीकारून सरकारने राजीनामा द्यावा: जितेंद्र आव्हाड



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दिकी यांना सिक्युरिटी असतानाही उडवले आहे. ही बाब अत्यंत गंभीर आहे.कायदा आणि सुव्यवस्थेचा धुवा उडलेला आहे. खासदार, आमदार, नेते सुरक्षित नसतील तर या सरकारला सत्तेत राहण्याचा अधिकार नाही. सरकारने राजीनामा द्यावा, अशी प्रतिक्रिया जितेंद्र आव्हाड यांनी देत सरकारवर टीका केली. प्रसार माध्यमांशी बोलताना ते म्हणाले की,गुन्हेगार कुर्लामध्ये भांड्याच्या घरात राहत होता. खबरीपासुन ते मुंबई पोलिसांनी सर्व ताब्यात ठेवण्याचे अतिशय प्रयत्न केले. मुंबई पोलिसांनी मुंबई उत्तम सांभाळली आहे. सिक्युरिटी मध्ये असणाऱ्या माणसाला असं उडवलं जात असेल तर ही चांगली गोष्टी नाही.कायम हसणारं सिद्दीकींच व्यक्तिमहत्व होत.जे काही झालं ते मुंबई पोलिसांना आणि सरकारला शोभणारं नाहीये, सामान्य नागरिकांपासून आमदार, खासदार, नेते सुरक्षित नसतील तर या सरकारला सत्तेत राहण्याचा काही अधिकार नाही.मुंबई - पुण्यात गेल्या सहा महिन्यापासून हत्या बलात्कार होतायत. सरकारने आपले नैतिक जबाबदारी पत्करून राजीनामा दिला पाहीजे, असे मत आमदार जितेंद्र आव्हाड यांनी व्यक्त केले.

### अवघ्या महाराष्ट्राचा कुलदैवत असलेल्या जेजुरीच्या खंडोबाच्या मल्हार गडावर मर्दानी दसरा मोठा उत्साहात पार पडतोय




दैनिक आपला विदर्भ


**जेजुरी/प्रतिनिधी :** अवघ्या महाराष्ट्राचा कुलदैवत असलेल्या जेजुरीच्या खंडोबाच्या मल्हार गडावर मर्दानी दसरा मोठा उत्साहात पार पडतोय.घटस्थापने नंतर या मर्दानी दसरा उत्सवाला सुरुवात होत असते.आज मर्दानी दसरा उत्सवाचा शेवटचा दिवस असून आज सकाळपासूनच जेजुरी गडावर खंडा तलवार स्पर्धा मोठ्या उत्साहात सुरू आहे.. सरदार पानसे यांनी दिले अले ४० किलो वजनाची खंडा तलवार हातावर तोडून धरून आणि विविध कसरती करून ही स्पर्धा पार पडत असते आज सकाळी या स्पर्धे ला सुरुवातझालीय.

# कापूस लागवड यंदा घटल्याने कापसाला चांगला भाव मिळण्याची शेतकऱ्यांना अपेक्षा

दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी :** यवतमाळ जिल्हा पांढरे सोने पिकवणारा म्हणून ओळखला जातो. याच जिल्ह्यात कळंब येथील ऋषभ मुनी यांनी कापसाचा शोध लावला. परंतु, याच जिल्ह्यातील शेतकरी नापिकीमुळे आर्थिक संकटात सापडले आहे. गेल्या वर्षी च्या तुलनेत यंदा कापसाची लागवड कमी झाली. त्यामुळे यंदा कापसाला चांगला भाव मिळेल अशी अपेक्षा शेतकऱ्यांसह व्यापाऱ्यांना आहे.





यवतमाळ जिल्ह्यात सर्वाधिक पीक कापसाचे घेतले जाते. शेतकऱ्यांची पूर्ण मदार खरीप हंगामातील पिकावर अवलंबून असते. मागील काही वर्षात अतिवृष्टी व ओला दुष्काळ यामुळे शेतकऱ्यांना नापिकीचा सामना करावा लागत आहे. या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांवर कर्जाचा ओझा वाढत चालला आहे. गेल्या वर्षी कापूस उत्पादन कमी झाले. त्यातच शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळाला नाही. कापसाची शेती तोट्यात आल्याने शेतकरी अन्य पिकाकडे वळले आहे. या खरीप हंगामात१० ते१५ टक्के कापूस लागवड कमी झाली. शेतकरी कापूस विक्रीसाठी बाजारात नेत आहे. या कापसाला सात हजार९०० ते८ हजार रुपयांचा प्रति क्विंटल भाव मिळत आहे. कापूस लागवड कमी झाल्याने या हंगामात कापसाला चांगला भाव मिळेल अशी अपेक्षा शेतकऱ्यांसह व्यापाऱ्यांना आहे.

खरीप हंगामात कापूस निघण्याला सुरुवात झाली आहे. सितादही झाली आहे. यवतमाळ जिल्हा हा पांढऱ्या सोन्याचा जिल्हा आहे. याच जिल्ह्यात ऋषभ मुनी यांनी कापसाचा शोध लावला. मागील वर्षी अतिवृष्टीमुळे कापसाचे उत्पन्न घटले. त्यातच भाव कमी मिळाला. यातून लागवड खर्च निघू शकला नाही. यंदा कापूस लागवड कमी असल्याने भाव चांगला मिळेल अशी अपेक्षा आहे. शेतकऱ्यांना प्रति क्विंटल दहा हजार रुपये भाव मिळायला हवा अशी आमची मागणी आहे.

बाजारात कापूस विक्रीसाठी अजून यायचा आहे. ज्या शेतकऱ्यांकडे कापूस आहे. त्या कापसाला ७९०० ते ८ हजार भाव मिळत आहे. मागील वर्षी उत्पन्न कमी झाले. त्यातच कापसाला भाव मिळाला नाही. यामुळे कापसाचा पेरा कमी झाला. यावर्षी पीक परिस्थिती चांगली आहे. शेतकऱ्यांना८ हजार रुपयांपेक्षा जास्त भाव मिळेल.

देशांतर्गत कापसाचा पेरा कमी झाला. शेतकरी तेलबिया आणि भुईमूग लागवडीकडे वळले. यवतमाळ लांबलेल्या पावसामुळे पेरण्या२० दिवस उशीरा झाल्या.त्यामुळे कापूस पीक उशीरा निघेल. ड्रीप सिंचन सुविधा उपलब्ध असलेल्या शेतकऱ्यांचा कापूस निघत असून,शेतकरी वेचणी करीत आहे. कापूस पेरा कमी झाल्याने ८ हजार रुपये प्रति क्विंटल भाव मिळेल,असा अंदाजआहे.

# अवैधरित्या रेती वाहतूक करणाऱ्या दोन टिप्पर वर कारवाई

## मेहकर पोलीस स्टेशनला पुन्हा दाखल

दैनिक आपला विदर्भ




**मेहकर/प्रतिनिधी :** अवैधरित्या गौण खनिजांची वाहतूक करणाऱ्या दोन टिप्पर वर मेहकर येथील अधिकारी निलेश मडके यांनी कारवाई करून सदर वाहन जप्त केले.याबाबत मेहकर पोलीस स्टेशनला दिलेल्या फिर्यादीवरून मेहकर पोलिसांनी वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई दि.११ ऑक्टोबर रोजी रात्री १० वाजताच्या दरम्यान करण्यात आली.

घटनेबाबत पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहिती उपविभागीय अधिकारी निलेश मडके यांनी मेहकर पोलीस स्टेशनला फिर्यादी दिली की, दि.११ ऑक्टोबर रोजी रात्री १० वाजताच्या दरम्यान गोपनिय माहीतीच्या आधारे सिंदखेडराजा तालुक्यातुन समृध्दी महामार्गाने तिन अवैध विनापरवाना रेती ची वाहतुक करीत असनारे टिप्पर मेहकर शहरात रात्री १२ ते १ वाजताच्या दरम्यान दरम्यान येणार आहेत, अशी माहिती मिळाली या माहितीवरून मी माझे कार्यालयीन कर्मचारी सदानंद पिसे, अजय जोहरे,वाहन चालक विशाल भवरे व एक पंच नवीन चव्हाण सर्व रा.मेहकर यांना घेवुन शासकिय वाहने रात्री अंदाजे समृद्वी माहामार्गाकडे जात असतांना वाटेत एक भरधाव वेगाने जात असनारा टिप्पर दिसुन आला. सदर वाहनाचा पाठलाग केला असता कंचनीचा महाल समोरिल श्री गजानन महाराज विसाव्याकडे जाणाऱ्या कच्या रत्याने सदर वाहन भरधाव वेगाळाने जाउ लागले. थोड्या अंतरावर गेल्यावर एक बुलेट चार व्यक्ती व एक स्पेंडर स्वार व्यक्ती आमच्या आडवे येवुन वाद घालु लागले व रस्त्यावर त्यांनि टिप्पर चालकाला रेती खाली टाकुन पळून जाण्याची सुचना केली त्यावरून सदर चालकाने आमच्या गाडी समोर रेती खाली टाकुन पळ काढला. व्यक्तीचे नाव इमरान आणि ओम गाडे असल्याचे समजले त्यानंतर आम्ही गाडी वळवुन इतर दोन टिप्पर वाहनाचा शोध घेतला असता सदर वाहनाने भालेगाव या गावात जाउन लपल्याचे समजले. आम्ही सांडलेल्या रती व वाहनाच्या खुना शोधत शोधत भालेगाव या गावात आमचे व पोलीसाचे पथक पोहचले असता गावा शेजारील निकम यांचे शेतातील कोठ्या जवळ दोन रेतिचे ३-३ ब्रास रेतिचे ढिग आढळुन आले तसेच कोठ्या मागे तुरीत दोन टिप्पर नुकतेच येवुन उभे राहल्याचे दिसून आले. सदर वाहनाचे चालक पळुन जाउन तुरीच्या शेतात दडुन बसल्याचे समजले आम्ही आवाज देवुन ही ते बाहेर आले नाहीत.सदर वाहनाची तपासनी केली असता सदर वाहनावर कोठेही वाहन क्रमांक टाकलेला आढळुन आला नाही.म्हनुन पोलीस कर्मचारी यांनी सदर दोन्ही वाहनाचे चे चेचीस क्रं नोंदविले आहेत एमएटी ५६७००५आर २००७०९७ व एमएसटी ५६७००५आर२ए००५८७ या क्रमांकाची टिप्पर व सदर शेतात आढळलेला रेतीचा पंचनामा करून गावातील पोलीस पाटलाचा ताब्यात रेती आणि दोन्ही टिप्पर देण्यात आले.


केंद्रीय आयुष आरोग्य व कुंटुब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते

# अमृत औषधालयाचे बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयात झाले लोकार्पण

### नामांकित कंपनीचे औषधी मिळणार माफक दरात

### बुलढाण्यातील अमृत औषधालय केंद्र महाराष्ट्रातील सातवे

दैनिक आपला विदर्भ




**बुलढाणा/प्रतिनिधी :** गरीब आणि गरजू लोकांना सवलतीच्या दरात उत्तम दर्जाची आणि नामांकित कंपनीची औषधे मिळण्याच्या दृष्टिकोनातून केंद्र सरकारच्यावतीने अमृत फार्मसी औषधालय केंद्र सुरू करण्यात आले आहेत बुलढाणा येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री यांच्या हस्ते नुकतेच अमृत औषधाला यायचं लोकार्पण करण्यात आलं असून महाराष्ट्रातील हे अमृत औषधालय सातवे .... केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी सार्वजनिक आरोग्य धोरणे तयार करण्यात आणि नागरिकांचे कल्याण सुनिश्र्चित करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. ते आरोग्य सेवा प्रणाली सुधारण्यासाठी, आरोग्य संकटांना प्रतिसाद देण्यासाठी आणि प्रतिबंधात्मक उपायांना प्रोत्साहन देण्यासाठी सतत काम करत आहेत. त्यांच्या नेतृत्वामुळे सामुदायिक आरोग्यावर सकारात्मक परिणाम होऊन गुणवत्ता सुधारण्यावर होणार आहे त्यांच्या प्रयत्नांमुळे जिल्हा शासकीय रुग्णालयात (सिव्हिल हॉस्पिटल) केंद्र सरकारच्या अमृत फार्मसी योजनेअंतर्गत एक नवी फार्मसी उघडली जाणार आहेत . अमृत म्हणजे परवडणारी औषधे आणि विश्र्वासार्ह इम्प्लांट्स, ज्याचा उद्देश कॅन्सर, हृदयविकार आणि इतर गंभीर आजारांसाठी स्वस्त दरात औषधे आणि इम्प्लांट्स उपलब्ध करून देणे हा आहे. देशातील २८ राज्यांमध्ये २४० अमृत फार्मसी आहेत, आणि महाराष्ट्रातील हे सातवे असेल. या योजनेमुळे गरीब आणि गरजू लोकांना ६०% पर्यंत सवलतीत उत्तम दर्जाची औषधे मिळतील,सर्व प्रकारच्या पेटंटेड, मार्केटेड आणि ब्रँडेड जेनेरिक औषधं, शस्त्रक्रियेसाठी लागणारी सामग्री, इम्प्लांट्स, हृदयरोग (कार्डियोलॉजी), नेत्रविज्ञान (ऑप्थाल्मोलॉजी), आणि अस्थिरोग (ऑर्थोपेडिक्स) यांसारख्या सामग्री ह्या औषधालयात माफक दरत सर्वासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे

बुलढाणा येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात अमृत औषधालय केंद्राचे उद्घाटन नुकतंच केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते झाले यावेळी एच एल एल लाईफ केअर लिमिटेड क्षेत्रीय प्रबंधक योगेंद्र शर्मा व्यवस्थापक श्रीलेश वाळके जिल्हा शल्य चिकित्सक डॉ भागवत भुसारी यांच्यासह जिल्हा सामान्य रुग्णालयातील डॉक्टर्स , परिचारिका व नागरिक उपस्थित होते ...

### आरोग्य विभागाच्या रुग्णालयांत यांत्रिकी सफाईसाठी ३१९० कोटी होणार खर्च!

**मुंबई/प्रतिनिधी :** सार्वजनिक आरोग्य विभागाच्या रुग्णालयांमध्ये यांत्रिकी सफाई करण्याचा निर्णय वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. प्रतिवर्षी ६३८ कोटी रुपये याप्रमाणे पाच वर्षासाठी ३१९० कोटी रुपयांमध्ये ही यांत्रिकी सफाई केली जाणार असून आतापर्यंत मनुष्यबळावर आधारित सफाईसाठी वार्षिक ७७ कोटी रुपये लागत होते. तर वैद्यकीय शिक्षण विभागाने वैद्यकीय महाविद्यालये व सलग्न रुग्णालयांसाठी अलीकडेच काढलेल्या निविदेनुसार सफाईसाठी १९३ कोटींचा खर्च येणार आहे.

आरोग्य विभागाची राज्यातील बहुतेक रुग्णालये ही जुन्या वास्तुमध्ये आहेत. यातील अनेक रुग्णालयात फरशा उखडलेल्या वा समतल नाहीत. वाढती रुग्णसंख्या लक्षात घेता पुरेशी स्वच्छतागृहे नाहीत व जी आहेत त्यांची अवस्था वाईट असते. परिणामी जुन्या वास्तुंमध्ये यांत्रिकी सफाई होण्यात अनेक अडचणी येऊ शकतात असे आरोग्य विभागाच्याच डॉक्टरांचे म्हणणे आहे.

## सामान्य जनतेसाठी ही धोक्याची घंटा, बाबा सिद्दिकी यांच्या हत्येनंतर शरद पवार संतापले



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याचे बडे नेते, माजी मंत्री बाबा सिद्धिकी यांची मुंबईत दसरा सणादिवशी अज्ञातांनी गोळ्या घालून हत्या केली. सिद्धिकी यांना लीलावती रुग्णालयात दाखल करण्याआधीच त्यांचा मृत्यू झाला. गेल्या काही दिवसांपासून राज्यातली कायदा सुव्यवस्थेची परिस्थिती अतिशय गंभीर आहे. याच पार्श्वभूमीवर ज्येष्ठ नेते शरद पवार यांनीही राज्य सरकारला घेरले आहे. गृहमंत्री आणि सत्ताधारी एवढ्या सौम्यतेने राज्याचा गाडा हाकणार असतील तर सामान्य जनतेसाठी धोक्याची घंटा ठरू शकते, अशा शब्दात शरद पवार यांनी जनतेला धोक्याची जाणीव करून दिली आहे.

मुंबईतील वांद्रे पूर्व येथे त्यांच्यावर जवळपास चार राऊंड फायर करण्यात आले. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या सिद्धिकी यांना लीलावती रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्या छातीत आणि पोटात दोन ते तीन गोळ्या लागल्याचे सांगण्यात येते. रुग्णालयात नेण्याआधीच त्यांचा मृत्यू झाला. गोळीबार करणाऱ्या तीन आरोपींपैकी दोन आरोपींना पोलिसांनी पकडल्याचे मुख्यमंत्र्यांनी माध्यमांना सांगितले.

राज्याची कोलमडलेली कायदा सुव्यवस्था चिंता वाढवणारी आहे. देशाच्या आर्थिक राजधानी मुंबईत माजी राज्यमंत्री बाबा सिद्धिकी यांच्यावर झालेला गोळीबार खेदजनक आहे. गृहमंत्री आणि सत्ताधारी एवढ्या सौम्यतेने राज्याचा गाडा हाकणार असतील तर सामान्य जनतेसाठी धोक्याची घंटा ठरू शकते. याची केवळ चौकशीच नको तर जबाबदारी स्वीकारून सत्ताधाऱ्यांनी आपल्या पदावरून पायउतार होण्याची गरज आहे. बाबा सिद्धिकी यांच्याप्रती भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबीयांप्रती सहवेदना व्यक्त करतो.

खंद्या साथीदाराचे निधन, अजित पवार काय म्हणाले?

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, माजी राज्यमंत्री, विधिमंडळात प्रदीर्घकाळ राहिलेले माझे सहकारी बाबा सिद्दीकी यांच्यावर झालेल्या गोळीबाराची घटना अत्यंत दुर्दैवी निषेधार्ह आणि वेदनादायी आहे. या घटनेत त्यांचे निधन झाल्याचे समजून मला धक्का बसला. मी माझा चांगला सहकारी, मित्र गमावला आहे. या भ्याड हल्ल्याचा मी तीव्र शब्दात निषेध करतो, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सिद्धिकी यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त करून श्रद्धांजली वाहिली.

# जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्याकडून पूरग्रस्त भागाची पाहणी

### दाताळा, मलकापूर शहरातील पूरस्थितीचा घेतला आढावा

दैनिक आपला विदर्भ




**बुलढाणा/प्रतिनिधी :** मलकापूर तालुक्यातील दाताळा व मलकापूर शहरामध्ये पुरामुळे नुकसानग्रस्त झालेल्या भागाची जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी पाहणी करुन पूरस्थितीचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी नुकसानग्रस्तांसोबत संवादही साधला.

दि. १२ ऑक्टोबर रोजी नळगंगा नदीला मोठ्या प्रमाणात आलेल्या पुरामुळे शेकडो घरांचे नुकसान झाले. दाताळा येथील ४७६ घरांमध्ये पाणी शिरले तसेच शंभरहून अधिक गोठे वाहून गेले. तसेच मलकापूर नगरपालिका क्षेत्रात ८५५ घरांमध्ये पाणी शिरल्यामुळे अनेक घरांचे नुकसान झाले. दिवसभर घरांमध्ये पाणी असल्यामुळे परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी पाहणी दौरा करुन उपाययोजना केल्या.

या दौऱ्यादरम्यान आमदार राजेश एकडे, माजी आमदार चैनसुख संचेती, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष उमाताई तायडे, उपविभागीय अधिकारी संतोष शिंदे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## विविध वृत्त...

### परतीच्या पावसाचा बुलढाण्यात विजेच्या कडाक्यासह धुमाकूळ

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाण्यात परतीच्या पावसाने धुमाकूळ घातला असून शहरात सलग तिसऱ्या दिवशी मुसळधार पाऊस सुरू आहे. यामुळे बुलढाणा मोताळा तालुक्यातील शेती पाण्याखाली गेली आहे.विशेष म्हणजे नळगंगा धरण १०० टक्के भरल्याने धरणाची ११ दरवाजे उघडले असुन नळगंगा नदीत विसर्ग सुरू आहे. अतिरिक्त पाणी सोडल्यामुळे नदीकाठच्या गावांत पाणी शिरले आहे.. बुलढाणा जिल्ह्यात अतिवृष्टीसह वादळी वारे आणि विजांच्या कडकडाट पाऊस सुरू आहे. गेल्या एक तासापासून शहरातील विद्युत पुरवठा खंडित झाला आहे. तर हा पाऊस मात्र शेतकऱ्यांच्या जीवावर उठला आहे. पडणाऱ्या पावसाचा काढणीला आलेले सोयाबीन,मका,ज्वारी या पिकांना फटका बसला आहे. तर काही ठिकाणी सोयाबीनच्या शेंगांना कोंब फुटल्याचे दिसत आहे. या परतीच्या पावसामुळे शेतकरी मात्र चिंतेत सापडला आहे.

### धनगर समाजाचे आरक्षणासंदर्भात ढोल बजाव आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण मिळावे यासाठी राज्यभर धनगर समाज वेळोवेळी आंदोलन करत आहे उपोषण करत आहे. त्याकडे सरकार दुर्लक्ष करत आहे धनगर समाजाच्या जमातीचे आरक्षण संदर्भात अंमलबजावणी करावी यासाठी ढोल बजाओ आंदोलन राज्यभरात करण्यात येत आहे आज चोपडा शहर व तालुक्यातील धनगर समाजाचे बांधवांनी सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करत ढोल बजाव आंदोलन केले. सदर आंदोलन ग्रामीण पोलीस स्टेशन पासून तहसील कार्यालय पर्यंत ढोल वाजवत व घोषणाबाजी करत आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामध्ये लहान बालकांपासून वयोवृद्ध नागरिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. सरकारने आरक्षणाचे अंमलबजावणी न केल्यास येणाऱ्या काळामध्ये तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देखील आंदोलनकर्त्यांनी दिला आहे.

### पुन्हा पुढे ढकलली राम चरणच्या गेम चेंजरची रिलीज डेट, करावी लागणार इतकी प्रतीक्षा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** साउथ सुपरस्टार राम चरण आणि कियारा अडवाणी यांचा आगामी चित्रपट 'गेम चेंजर' बऱ्याच दिवसांपासून लोकांमध्ये चर्चेत आहे. एस शंकर या चित्रपटाचे दिग्दर्शन करत आहेत. "RRR' नंतर राम चरण या चित्रपटातून पुनरागमन करत आहे. बऱ्याच दिवसांनी त्याला मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठी प्रेक्षक उत्सुक आहेत. मात्र, लोकांच्या प्रतिक्षेदरम्यान चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलण्यात आल्याचे बोलले जात आहे.

'गेम चेंजर'च्या नवीन अपडेटनुसार, हा चित्रपट आता पुढील वर्षी मकर संक्रांतीच्या आसपास प्रदर्शित होणार आहे. आधी हा चित्रपट २० डिसेंबर २०२४ रोजी प्रदर्शित होणार होता, पण नंतर चित्रपटाची तारीख पुढे ढकलण्यात आली. या नव्या तारखेबाबत चित्रपट निर्मात्याने अधिकृतपणे माहिती दिली आहे. चित्रपटाच्या प्रोडक्शन हाऊसचे ऑफिशियल व्यंकटेश्र्वर क्रिएशन्सने एक व्हिडिओ संदेश शेअर केला आहे.

शेअर केलेल्या व्हिडिओ मेसेजमध्ये असे सांगण्यात आले की, चित्रपटाची पोस्ट-प्रॉडक्शन प्रक्रिया डिसेंबर २०२४ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे, त्यामुळे या वर्षाच्या उर्वरित तीन महिन्यांत चित्रपटाची गाणी प्रदर्शित केली जातील. अधिकृत अकाऊंटवर शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये असेही म्हटले आहे की, 'गेम चेंजर'च्या प्रदर्शनाच्या तारखेत बदल झाल्यामुळे अभिनेता चिरंजीवीचा आगामी चित्रपट 'विश्र्वंभरा'च्या निर्मात्यांनाही रिलीजच्या तारखेबाबत पुन्हा विचार करावा लागणार आहे. आम्ही तुम्हाला सांगतो की, 'विश्वंभरा'ची रिलीज डेट अद्याप निश्चित झालेली नाही.

### ते एक खरे नेते होते... बाबा सिद्दीकी यांच्या हत्येनं क्रिकेटपटू युवराज सिंगला धक्का

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते बाबा सिद्दीकी यांची शनिवारी रात्री उशिरा मुंबईत गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. या घटनेनंतर त्यांना तात्काळ लीलावती रुग्णालयात नेलं असता त्यांचा मृत्यू झाला. घटनेच्या वेळी ते त्यांचा मुलगा आणि आमदार जीशान सिद्दीकी यांच्या कार्यालयाबाहेर दसरा साजरा करत होते. महाराष्ट्रातील बड्या नेत्यांमध्ये बाबा सिद्दीकीच्या नावाचा समावेश असून त्यांचं राजकारणी तसंच सेलिब्रिटींशी चांगले संबंध होते. त्यामुळं त्यांच्यावर गोळीबार झाल्याची माहिती मिळताच बॉलिवूडमधील अनेक कलाकार लीलावती रुग्णालयात पोहोचले. तर भारताचा माजी क्रिकेटपटू युवराज सिंगही त्यांच्या हत्येनं हादरला आहे. या घटनेबद्दल त्यानं निषेध व्यक्त करत त्यांच्या आत्म्याला शांती मिळावी यासाठी प्रार्थना केली.

काय म्हणाला युवराज सिंग? : बाबा सिद्दीकी यांच्या निधनाची माहिती युवराज सिंगला समजताच त्यानं रात्री २ वाजता सोशल मीडियावर पोस्ट करत शोक व्यक्त केला.